निर्णय क्र. मविनिआ/माअअ/अपील/०३/२०१५/००००४ दिनांक- ३०.०३.२०१५

अपील क्र. मविनिआ/माअअ/अपील/०३/२०१५

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे**

अपीलकर्ता

श्री. आनंद शिवराम ओक,
मु.पो.बोरगांव,
ता-चिपळूण,
जि-रत्नागिरी.

माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याची तारीख २९.१२.२०१४

जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याची तारीख ०४.०२.२०१५

प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २५.०३.२०१५

**मागितलेली माहिती**

मुख्य अभियंता (वाणिज्य) MSEDCL, वांद्रे, मुंबई दि.२० जून, २०१४ (मूळ पत्र) दि. २८ ऑगस्ट, २०१४ (स्मरणपत्र-१), २८ सप्टेंबर, २०१४ (स्मरणपत्र -२) आणि ऑक्टोबर २०१४ (स्मरणपत्र - ३) अशी रजिस्टर्ड ए/डी ने ०४ पत्रे सादर करुन त्या प्रत्येकाच्या प्रती मुख्याधिकारी, MERC, मुंबई यांना सादर करुन त्यांच्या कार्यवाहीची मागणी व विनंती केली होती त्या पत्रावर त्यांचेकडून केल्या गेलेल्या कार्यवाही बाबतची माहिती मिळावी.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर**

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र. मविनिआ/माअअ/०२/२०१५/०१५६१ दि.०४.०२.२०१५ नुसार अपिलार्थी यांना दिलेली माहिती येणे प्रमाणे -

आपण सदर सर्व पत्रे ही MSEDCL यांच्या नावे पाठविलेली आहेत. या कार्यालयाला फक्त सदर प्रती फक्त माहितीस्तव सादर केलेल्या आहेत. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ही एक अर्ध न्यायिक संस्था असल्यामुळे अशा माहितीस्तव आलेल्या पत्रांवर कोणतीही कार्यवाही करत नाही. जर ग्राहकांच्या वैयक्तिक स्वरुपाच्या तक्रारी असतील तर त्यासाठी आयोगाने ग्राहक तक्रार निवारण या यंत्रणेची निर्मिती केलेली आहे (CGRF) प्रकरणारुप ग्राहक त्यांच्या तक्रारींसाठी या यंत्रणेकडे दाद मागू शकतो.

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण-**

माहीती अधिकारी यांनी जी माहिती पाठविलेली आहे ती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याने सदरचा अपील अर्ज दाखल केलेला आहे.

**आदेश (माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम १९ अंतर्गत)-**

मागितलेली माहिती वरिल नमूद केलेल्या कारणांकरिता अपीलकर्ता यांनी अपील दाखल केले आहे.

१. माझ्या चारही पत्रांचे अवलोकन केले तर असे स्पष्टपणे निदर्शनास येईल/येते की सर्व पत्रांच्या प्रती MERC यांचे कार्यालयास माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर या शब्दप्रयोगासहीत पाठविलेल्या आहेत. म्हणजेच MERC च्या माहिती अधिका-यांनी केलेला फक्त माहितीस्तव सादर केलेल्या आहेत. हा त्यांचा खुलासा पूर्णत: खोटा, चूकीचा तसेच दिशाभूल करणारा असून तो त्यांनी मुददामहून व जाणून बुजून केलेला आहे.

२. आक्षेप क्र.०१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे माझ्या चारही पत्रांच्या प्रती MERC यांचे कार्यालयास माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर या शब्दप्रयोगासहित पाठविलेल्या आहेत. याचाच अर्थ MERC कडून कार्यवाहीची अपेक्षा असल्याने सदरची पत्रे व त्याच्या प्रती या केवळ माहितीसाठी MERC ला पाठविलेल्या नाहीत. त्यामुळे केवळ माहितीस्तव आलेल्या पत्रांवर MERC कोणतीही कार्यवाही करत नाही हा MERC च्या माहिती अधिका-यांनी केलेला खुलासा पूर्णत: खोटा, चूकीचा तसेच दिशाभूल करणारा असून तो त्यांनी मुददामहून व जाणून बुजून केलला आहे.

MERC ही अर्धन्यायिक संस्था असल्याचे कळविले गेले आहे साहजिकच MSEDCL यांच्या कारभारावर या न्यायीक संस्थेचे नियंत्रण असणे अपेक्षित आहे. माझ्या दि.२०.०६.२०१४ च्या मुळ पत्रांत नमुद केलेल्या आक्षेप/मुददे यांना MSEDCL यांजकडे कोणत्याही परिपत्रकाचा आधार नाही त्यामुळे MSEDCL यांची माझे आक्षेपाबाबतची कृती पूर्णत: बेकायदेशीर स्वरुपाची आहे. त्यांची ही कृती MERC ला सुध्दा माहीत आहे. त्यांनी स्वत:हून अशा बेकायदेशीर व निराधार असलेल्या पध्दती बंद करणे निदान त्याबाबत त्यांचे निदर्शनास आणून दिल्यावर तरी त्याबाबतीत आदेश देणे योग्य व स्वागतार्ह होते. परंतू मागणी करुनही MSEDCL उत्तर तर राहोच पत्राची पोहोच देत नाहीत या पार्श्वभूमीवर MERC च्या माहीती अधिका-यांनी खोटी माहिती देणे ही MERC & MSEDCL एकमेकांना सामिल असल्याचे द्योतक आहे. ग्राहकाचे पत्र आल्यावर त्याला उत्तर दिले जाणे ही पुढील अगर नंतरची बाब ठरते निदान त्याची पोहाच दिली जाणे हे सभ्य व सनदशिर पत्रव्यवहारचे लक्षण आहे याची साधी जाणीवही MERC & MSEDCL यांच्या कार्यालयास नाही. माझे पत्रावर काहीच कारवाई तसेच कार्यवाही करावी लागू नये म्हणून या दोन्ही कार्यालयांनी ठरवुनच मौन पाळलेले आहे. सदर बाब फारच गंभीर असल्याने मला केवळ नाईलाजानेच माहितीच्या अधिकाराचा वापर करुन माझ्या पत्रांची स्थिती (status) विचारावी लागली. या पार्श्वभूमीवर MERC च्या माहिती अधिकारी यांनी केलेला हा खुलासाही पूर्णत: खोटा, चूकीचा तसेच दिशाभूल करणारा असून तो त्यांनी मुददामहून व जाणून बुजून केलेला आहे.

३. MSEDCL कडे माझ्या मागण्या पुढील प्रमाणे आहेत.

१) बिले रु. ५.०० तसेच १०.०० च्या पटीत राऊंडप केली जातात ती पध्दती सुधारली जाऊन देयके rounded up to the nearest rupee या पध्दतीने दिली जावीत.

२) दिल्या जाणा-या बिलांमधील खालील चुकीच्या नोंदी दुरुस्त केल्या जाव्यात.
देयकाचा कालावधी हा मागील मिटर रिडींग ते चालू मिटर रिडींग प्रमाणेच नमूद केला जावा.
बिल देयकाचा महिना रिडींगच्या तारखानुसार नमूद केला जावा.
मिटर रिडिंगची तारिख देयकावर नमूद करणेत यावी.

३) थकीत (Defaulter) ग्राहकाची नियामानुसार असलेली व्याख्या कळविली आहे.
या पैकी क्र.१ बाबतीत (CGRF) यांजकडे एका तक्रारीमध्ये (ग्राहक तक्रार क्र. ६४/२०१३ दि.२३.१२.२०१३, रत्नागिरी CGRF) या बाबत मागणी केली होती, परंतू या संबंधात मंच निकाल देऊ शकत नसल्याचे तोंडी सांगितले गेलेले आहे.तसेच स्थानिक कार्यालये सुध्दा बिलींगचा प्रोग्रॅम हा MSEDCL ने म्हणजेच त्यांच्या मुख्य कार्यालयाने तयार करुन दिलेला असल्याने त्यांत त्यांचे पातळीवर काहीही फेरबदल करता येत नसल्याचे सांगीतले गेले आहे. या पार्श्वभूमीवर MSEDCL

कडे दाद मागणे क्रमप्राप्त ठरल्याने त्यांजकडे मुळ पत्र व तिन स्मरणपत्रे सादर करुन त्यासर्वाच्या प्रती MERC कडे ती संस्था MSEDCL च्या कारभारावर नियंत्रण ठेवणारी असल्याने माहितीसाठी व योग्यत्या कार्यवाहीसाठी पाठविलेली होती. केवळ माहितीसाठी पाठविलेल्या पत्रांवर ही संस्था कोणतीही कार्यवाही करत नाही. या त्यांच्या खुलाशामुळे कार्यवाहीसाठी पाठविलेल्या पत्रावर मात्र नक्कीच MERC कडून कार्यवाही केली जाते हे त्यांनीच कबूल केलेले आहे. माझ्या पत्रांच्या प्रती सुध्दा कार्यवाहीसाठीच पाठविलेल्या असूनही प्रत्यक्षांत मात्र MERC च्या माहिती अधिकाऱ्यानी केलेला खुलासा पूर्णत: खोटा, चूकीचा तसेच दिशाभूल करणारा असून तो त्यांनी मुददामहून व जाणून बूजून केलेला आहे.

संबंधित अर्जावर आयोगाच्या कार्यालयामध्ये दि. १९.०३.२०१५ रोजी दुपारी सुनावणी ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीत जन माहिती अधिकारी यांनी आपले निवेदन सादर केले. सदर सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर होते. अपिलार्थी यांनी पाठविलेल्या त्यांच्या दि. २५.०३.२०१५ च्या पत्रानुसार असे कळविले आहे की, त्यांना सुनावणीची नोटीस उशीरा मिळाल्यामुळे ते सुनावणीस उपस्थित राहू शकत नाही व त्यामुळे त्यांची अनुपस्थिती समजण्यात येऊ नये व अपील एकतर्फा निकाली काढली जाऊ नये. अपीलार्थी यांचा सदर पत्र रेकॉर्डवर ठेवण्यात आला आहे व त्यातील मुददे आदेश पारीत करतांनी ग्राहय धरले आहेत, व सदरहू अपील ही अपीलाच्या गुणवत्तेवर निकाली काढण्यात येत आहे.

माहिती अधिकाराच्या अर्जावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांचे पत्रव्यवहार मुख्य अभियंता (वाणिज्य), MSEDCL यांच्याशी वेळोवेळी केलेला आहे व अर्जाची प्रत प्रतीलिपी म्हणून मुख्याधिकारी, म.वि.नि.आ. यांस माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी सादर करण्यात आल्याचे दिसून येत आहे.

वरील अपिलार्थी यांच्या पत्रावर काय कार्यवाही झाली याबाबतची माहिती, माहिती अधिकारी यांना विचारलेली आहे. व त्याअनुषंगने माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर समर्पक व योग्य आहे. करिता अपिल निकाली काढण्यात येत आहेत.

जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(अनिलकुमार उके)
उपसंचालक (विधी) तथा
प्रथम अपीलीय अधिकारी.

प्रत- जनमाहिती अधिकारी, मविनिआ, यांना माहितीसाठी.